MHAH230001472017

## विशेष दिवाणी दावा क्र. ८/२०१७ मधील नि.४७ वरील आदेश

१. वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ नुसार वादपत्रात दुरुस्ती करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादीचे कथनानुसार, प्रस्तुत दावा त्यांनी प्रतिवादींविरुध्द खरेदीखत करून मिळण्यासाठी, निरंतर मनाई हुकुम मिळण्यासाठी व इतर दादी मिळण्यासाठी दाखल केला आहे. दावा दाखल करतेवेळी प्रतिवादी क्र. २ ते ४ हे अज्ञान होते. ते आता सज्ञान झाले आहेत. तरी प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचे दावा सरनाम्यातील वय व अ.पा.क.जनक आई प्रतिवादी क्र.१ श्रीमती सिंधुबाई बबन लगड हा मजकुर वगळुन अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. २ ते ४ यांच्या वयात दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे. वादीच्या पुढील कथनांनुसार सदर दुरुस्ती ही तांत्रिक स्वरूपाची आहे. त्यामुळे दाव्यातील स्वरूपामध्ये कोणताही बदल होत नाही अथवा कोणतेही नविन कथन दाव्यात करण्यात येत नाही. सदर दुरुस्तीस परवानगी दिल्यास प्रतिवादींचे काहीएक नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज.

२. प्रतिवादींनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला. सदर प्रतिवादीचे कथनानुसार, सदर दुरुस्ती मुदतीत नाही. तरी प्रस्तावित दुरुस्तीची मागणी खर्चासह रद्द करावी, असे त्यांचे कथन आहे.

**३.** वादी व प्रतिवादी यांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

**४.** अर्ज व म्हणण्यातील कथनांवरुन पुढील वादप्रश्न उपस्थित होतात. सदर वादप्रश्न व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेह पुढीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जात विनंती केल्यानुसार वादपत्रात दुरुस्ती होवून मिळण्यास वादी हक्कदार आहेत काय ? | **...होकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>वादप्रश्न क्र. १ व २ बाबत</u> –**

**५.** वादपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा खरेदीखत रद्द करुन निरंतर मनाई हुकूम मिळणेकामी दाखल केला आहे. मुळ निशाणी १ चे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.२ ते ४ हे अज्ञान दिसून येतात व त्यांच्याकरीता अ.पा.क. म्हणुन त्यांच्या आईचे नावे नमुद असल्याचे दिसुन येते. सदर दुरुस्ती ही औपचारीक स्वरूपाची असून केवळ सदर तिनही पक्षकार सज्ञान झाल्याने दाव्यात तांत्रिक दोष राहू नये म्हणून करीत असल्याचे दिसून येते. सदर दुरुस्ती झाल्यास दाव्याचे स्वरूप बदलणार नाही अथवा प्रतिवादींचे कुठलेही नुकसान होणार नाही. सबब वाद प्रश्न क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देण्यात येत असून वादप्रश्न

क्र. २ करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. नि. ४७ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. नि. ४७ येथील अर्जातील विनंतीनुसार वादीने पुढील तारखेस अगर तत्पुर्वी वादपत्रात दुरुस्ती करुन दुरुस्त वादपत्राची प्रत सादर करावी व त्याची प्रत प्रतिवादींना पुरवावी.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN

Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2025.01.20 13:28:46 +0530

दिनांक २०/०१/२०२५
श्रीगोंदा.

दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.